दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

## ओबीसींच्या राजकीय लढ्याला सुरुवात

**मुंबई–** प्रकाश आंबेडकर यांची जालना येथे जाहीर सभा झाली. यावेळी बोलताना त्यांनी राज्यातील ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावर भाष्य केले आहे. आज धर्म नव्हे तर ओबीसी धोक्यात आहेत. ओबीसी सत्ताधारी झाल्याशिवाय आरक्षण वाचणार नाही. ओबीसींच्या राजकीय लढ्याला सुरुवात झाली आहे, असे प्रकाश आंबेडकर म्हणाले. जालना येथे जाहीर सभेत ते बोलते होते. जरांगे मुंबईत ठिय्या मांडून बसले आणि काँग्रेस, भाजप, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादीचे १९० आमदार जरांगेंच्या दर्शनाला गेले. हेच आमदार देवेंद्र फडणवीस यांना भेरले तशी फडणवीस यांची भाषा बदलली, अशी टीका आंबेडकरांनी केली आहे.

vadalvartanews@gmail.com   संपादक : अजय भांगे   https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • मंगळवार दि.११ नोव्हेंबर २०२५ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक ८१ • पाने ४ • किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi • Tuesday 11 Nov 2025 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 81 • Pages 4 • Rate 4 Rs

# दिल्लीच्या ऐतिहासिक लाल किल्ल्या जवळ कारमध्ये भीषण स्फोट!

## दहशतवादी कटाचा संशय; सुरक्षा यंत्रणा हाय अलर्टवर

## २ तासांतच एक संशयित ताब्यात! दिल्ली स्फोट प्रकरणी पोलिसांची मोठी कारवाई

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)–राजधानी दिल्लीतील लाल किल्ला मेट्रो स्टेशनच्या गेट क्रमांक १ जवळ सोमवारी सायंकाळी ६ वाजून ५५ मिनिटांनी झालेल्या भीषण स्फोटाने मोठी खळबळ उडाली आहे. या स्फोटामुळे पार्किंगमध्ये असलेल्या गाड्यांना आग लागली आणि परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. हा स्फोट इतका भीषण होता की, यामध्ये आतापर्यंत ११ जणांचा मृत्यू झाला असून, ३० हून अधिक लोक जखमी झाले आहेत. जखमींवर तातडीने रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या गंभीर घटनेनंतर सुरक्षा यंत्रणांनी अतिशय जलद गतीने कारवाई केली आहे. स्फोट झाल्यानंतर केवळ दोन तासांच्या आतच एका संशयित व्यक्तीला ताब्यात घेण्यात आले असून, त्याच्याकडे कसून चौकशी सुरू आहे. सध्या सुरक्षा यंत्रणांना या स्फोटामागे केवळ अपघात नसून घातपात (डर्लोंरसश) असल्याचा तीव्र संशय आहे. तपासाचे धागेदोरे जोडले जात असतानाच, याच दिवशी सकाळी हरियाणातील फरिदाबाद येथे सात दहशतवाद्यांना अटक करण्यात आली होती. या स्फोटाचा फरिदाबादमध्ये अटक झालेल्या दहशतवाद्यांशी काही संबंध आहे का, या दिशेने तपास करण्यात येत आहे. या संशयिताच्या अटकेमुळे स्फोटामागील कटाचा लवकरच पर्दाफाश होण्याची शक्यता आहे.


### लाल किल्ला स्फोटात हरियाणाची 'i20' कार

गृहमंत्र्यांनी दिलेल्या माहितीनुसार, स्फोटात वापरण्यात आलेली ही गाडी ळ२० मॉडेलची होती आणि तिचा क्रमांक गुरुग्राम (Gurugram), म्हणजेच हरियाणातील होता. गाडीच्या या क्रमांकावरून आता तपास यंत्रणांना तपासाची दिशा मिळाली असून, स्फोटामधील गुंता सोडवण्यासाठी तपासाला मोठी गती मिळण्याची शक्यता आहे. या प्रकरणातील कोणतीही शक्यता वगळता सर्व बाजूंची कसून चाचपणी करण्याचे निर्देश केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दिले आहेत. पोलीस परिसरातील सीसीटीव्ही फुटेज देखील तपासत आहेत, ज्यामुळे स्फोटाच्या आधी आणि नंतरच्या घडामोडींची माहिती मिळू शकेल. हा स्फोट घातपाती आहे की अपघात, याचा शोध घेण्यासाठी तपास यंत्रणा युद्धपातळीवर काम करत आहेत.



### फरिदाबाद मेडिकल कॉलेज मधून ७ दहशतवादी अटकेत

या कारवाईमुळे दिल्ली स्फोटामागे असलेले दहशतवादी कनेक्शन अधिक गडद झाले आहे. सोमवारी सकाळी सुरक्षा यंत्रणांनी फरिदाबाद मेडिकल कॉलेजमधून मोठी कारवाई करत एका मोठ्या दहशतवादी कटाचा पर्दाफाश केला. या कारवाईत दोन डॉक्टरांसह एकूण सात दहशतवाद्यांना अटक करण्यात आली आहे. याशिवाय, त्यांच्या ताब्यातून तब्बल ३५० किलो स्फोटक आणि मोठा शस्त्रसाठा जप्त करण्यात आला आहे. या कारवाईचे सर्वात चिंताजनक कारण म्हणजे, हे फरिदाबाद मेडिकल कॉलेज दिल्लीतील लाल किल्ला स्फोटस्थळापासून अवघ्या एका तासाच्या अंतरावर आहे. त्यामुळे, सकाळी फरिदाबादमध्ये पकडलेल्या या सात दहशतवाद्यांचा आणि सायंकाळी दिल्लीत झालेल्या भीषण स्फोटाचा काही संबंध आहे का, याचा कसून तपास तपास यंत्रणा करत आहेत. ही कारवाई देशातील सुरक्षेसाठी मोठी आणि महत्त्वाची मानली जात आहे.



### स्फोटानंतर २ तासांत 'संशयित' ताब्यात

या स्फोटाच्या घटनेनंतर पोलिसांनी अतिशय जलद गतीने कारवाई केली आहे. स्फोट घडल्यानंतर अवघ्या दोन तासांच्या आतच एका संशयित व्यक्तीला ताब्यात घेण्यात आले आहे. या संशयिताला ताब्यात घेतल्यामुळे आता या संपूर्ण तपासाला मोठी गती मिळण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. स्फोटामागील कारणे आणि त्यामागील व्यक्तींचा लवकरच उलगडा होऊ शकतो. दिल्ली स्फोटानंतर या घटनेमागे केवळ अपघात नसून घातपात (Sabotage) असल्याचा गंभीर संशय तपास यंत्रणांकडून व्यक्त केला जात आहे. ताब्यात घेतलेल्या संशयिताची कसून चौकशी सुरू आहे. फरिदाबादमध्ये अटक करण्यात आलेल्या दहशतवाद्यांशी या संशयिताचे काही कनेक्शन आहे का, या दिशेने पोलीस तपास करत आहेत. दिल्लीत तणावाचे वातावरण असून, पोलीस यंत्रणांनी सुरक्षा व्यवस्था अधिक कडक केली आहे.

### लाल किल्ला स्फोटात ११ जणांचा बळी! गृहमंत्री अमित शहांकडून तातडीने माहिती

हा स्फोट इतका तीव्र होता की, दोनदा मोठ्या स्फोटाचा आवाज ऐकू आल्याची माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली आहे. या स्फोटामुळे लागलेल्या भीषण आगीत पार्किंगमध्ये असलेली काही वाहने जळून खाक झाली. या अत्यंत दुर्दैवी घटनेत ११ जणांचा मृत्यू झाला असून, ३० पेक्षा अधिक नागरिक जखमी झाले आहेत. स्फोटात जखमी झालेल्या सर्व नागरिकांवर तातडीने रुग्णालयात उपचार सुरू करण्यात आले आहेत. या घटनेची माहिती मिळताच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी तातडीने रुग्णालयात जाऊन जखमींची भेट घेतली. तसेच, त्यांनी या घटनेबद्दल महत्त्वाचे वक्तव्य केले. गृहमंत्री म्हणाले की, स्फोटाचे कारण अद्याप समजू शकलेले नाही, मात्र या प्रकरणातील सर्व शक्यतांची चाचपणी सुरू आहे. तपास यंत्रणांना या घटनेमागील कारणे आणि शक्तींचा शोध घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# गेवराई शिवसेना व घटक पक्षातील उमेदवारांच्या ११ नोव्हेंबर रोजी मुलाखती

## इच्छुक उमेदवारांनी आपल्या कार्य अहवालासह उपस्थित रहावे–चंद्रकांत नवले

दैनिक वादळ वार्ता

बीड । प्रतिनिधी

आगामी नगरपरिषद व नगरपंचायत निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या वतीने उमेदवार निवडीची प्रक्रिया सुरू झालेले आहे. या पार्श्वभूमीवर पक्षाकडून उमेदवारी अर्ज दाखल करू इच्छित असलेल्या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती दिनांक ११. ११. २०२५ रोजी मोंढा नाका गेवराई येथे शहर प्रमुख श्री. मुकेश महाजन यांच्या संपर्क कार्यालयामध्ये आयोजित केले आहेत. शिवसेना व घटक पक्षातील इच्छुक उमेदवारांनी आपल्या कार्य अहवालासह सकाळी ११.०० ते ०४.०० वेळेत मुलाखतीसाठी उपस्थित राहावे. असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख ड. चंद्रकांत नवले, तालुकाप्रमुख श्री उद्धव बापू मडके, शहरप्रमुख श्री. मुकेश महाजन व सर्व पदाधिकारी यांनी केले आहे.



मुलाखतीदरम्यान गेवराई शहरातील शिवसेनेचे मुख्य पदाधिकारी व निरीक्षक उपस्थित राहणार असून, प्रत्येक प्रभागातून अभ्यासू, नेतृत्वसक्षम,लोकाभिमुख, विकासाभिमुख आणि समाजकार्यासाठी जास्तीत जास्त वेळ देणारा चेहरा पुढे आणण्यावर भर दिला जाणार आहे. ही संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडणार असल्याचे चंद्रकांत नवले यांनी स्पष्ट केले. नगरपालिका निवडणुका या केवळ राजकीय स्पर्धा नसून शहराच्या भविष्यास आकार देणाऱ्या प्रक्रिया आहेत. पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, वाहतूक, बाजारव्यवस्था व नागरिक कल्याण यांसारख्या जीवनावश्यक कामांची जबाबदारी नगरपालिका व्यवस्थेवर असते. त्यामुळे सक्षम आणि विकासाभिमुख नेतृत्व निवडणे अत्यावश्यक असल्याचेही जिल्हाप्रमुख चंद्रकांत नवले यांनी सांगितले.

# नांदेड येथे प्रत्येक प्रभागात आधार केंद्र सुरू करण्याची मनसेची मागणी

दैनिक वादळ वार्ता

नांदेड ।। प्रतिनिधी

नांदेड शहरातील सामान्य नागरिकांना आधार कार्ड अपडेट व नवीन नोंदणीसाठी मर्यादित केंद्रांमुळे होणारा त्रास लक्षात घेता महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देण्यात आले. या निवेदनात प्रत्येक प्रभागात स्वतंत्र आधार केंद्र सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे.सध्या आधार अपडेट किंवा नवीन नोंदणीसाठी नागरिकांना लांबचा प्रवास, वेळेचा आणि आर्थिक फटका सहन करावा लागत आहे. त्यामुळे शहरातील प्रत्येक प्रभागात एक आधार केंद्र सुरू करून नागरिकांना सोयीचे व्हावे, अशी विनंती निवेदनात करण्यात आली. तसेच नवीन



आधार नोंदणीसाठी जन्मदाखला आवश्यक ठेवावा, मात्र जुने आधार अपडेट करताना ती अट लागू करू नये, अशी मागणीही मनसेतर्फे करण्यात आली.हे निवेदन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहर सचिव महेश ठाकूर यांच्या वतीने सादर करण्यात आले. यावेळी मनसे जिल्हाध्यक्ष मॉन्टीसिंघ जहागीरदार, शहराध्यक्ष अब्दुल शफिक, जिल्हा सचिव सुभाष भंडारे, शहर उपाध्यक्ष अब्दुल खादर, वाहतूक सेना शहराध्यक्ष शंकर सरोदे आणि बिलोली तालुका अध्यक्ष सुदर्शन आदमनकर उपस्थित होते.

# शिवसेना कार्यालय हाऊसफुल; शेकडो इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती संपन्न!

## बीड नगर पालिका निवडणूक पूर्ण ताकदीने लढवून शिवसेनेचा भगवा फडकवू–अनिलदादा जगताप

दैनिक वादळ वार्ता

बीड । प्रतिनिधी

शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये आगामी नगरपालिका निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर शिवसेनेना पक्षाकडून उमेदवारीसाठी अर्ज दाखल केलेल्या शेकडो इच्छुक उमेदवारांचे मुलाखत सत्र काल सोमवारी दि. १० नोव्हेंबर २०२५ रोजी शिवसेना मध्यवर्ती कार्यलय, बीड येथे पार पडले असून या मुलाखत सत्रादरम्यान जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांचे शिवसेना मध्यवर्ती कार्यलय हाऊसफूल झाल्याचे पाहायला मिळाले. प्रत्येक प्रभागातून अभ्यासू, नेतृत्वसक्षम, लोकाभिमुख आणि विकासाभिमुख चेहरा पुढे आणण्यावर भर दिला जाणार आहे. ही संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडणार असल्याचे अनिलदादा जगताप यांनी स्पष्ट केले होते. यामुळे काल सकाळी १०.०० वाजल्यापासूनच शेकडो इच्छुक उमेदवार आपल्या कार्य अहवालासह शिवसेना मध्यवर्ती कार्यलयात उपस्थित होते. सर्व इच्छुक उमेदवारांची मुलाखत शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली तर मुलाखतीदरम्यान बीड शहरातील शिवसेनेचे मुख्य पदाधिकारी व निरीक्षक देखील उपस्थित होते. नगरपालिका निवडणुका या केवळ राजकीय स्पर्धा नसून शहराच्या भविष्यास आकार देणाऱ्या प्रक्रिया आहेत. पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, वाहतूक, बाजारव्यवस्था व नागरिक कल्याण यांसारख्या जीवनावश्यक कामांची जबाबदारी नगरपालिका व्यवस्थेवर असते. त्यामुळे सक्षम आणि विकासाभिमुख नेतृत्व निवडणे अत्यावश्यक असल्याचे जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी नमूद केले. लवकरच शिवसेना आपले उमेदवार जाहीर करून पूर्ण ताकदीने नगर पालिका निवडणूक लढवेल आणि बीड नगरपालिकेवर शिवसेनेचा भगवा फडकवेल असा ठाम विश्वास शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी व्यक्त केला.



## संपादकीय

# हापूस आंबा लांबणीवर...!



संतोष वायंगणकर कोकणच्या किनारपट्टीला मागील काही दिवसांमध्ये मुसळधार पाऊस, वादळी पाऊस असे समिश्र वातावरण तयार झाले आहे. साहजिकच याचा एक विचित्र परिणाम आंबा बागायतींवर होत आहे. ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यात सर्वसाधारणपणे मोहोर येतो. यावर्षी मोहोर आलाच नाही. थंडीही गायब आहे. आता जरी पाऊस थांबला तरीही भरपूर मोहोर येण्यास डिसेंबर महिना उजाडणार आहे. यामुळे साहजिकच यावर्षीचा प्रथमचा आंबा बाजारात यायला मार्च महिना उजाडणार आहे. त्यामुळे कोकणातील हा हापूस आंबा देशभरातील बाजारात मोठ्या प्रमाणावर दिसायला निश्चितच एप्रिल-मे महिना उजाडण्याची शक्यता नाकारता येणार नाही... महाराष्ट्रात पाऊस थांबायचं नाव घेत नाही. कोकणातील भातशेतीवर या अतिवृष्टीचा परिणाम गावो-गावी झाला. यामुळे कोकणातील भातशेती पाण्याखाली गेली. गुरांना लागणारे गवतही मिळणे अवघड झाले आहे. पाणथळ भागात असणारी शेती पाण्याखालीच गेली आहे. यामुळे कोकणातील भातशेती करणारा शेतकरी, तसेच नाचणी आणि तृणधान्य करणाऱ्या शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. एकीकडे भातशेतीचे नुकसान झालेले असताना आंबा, काजू बागायतदारही चिंतेत आहेत. याचे कारण नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यातही पाऊस कोसळत आहे. आजही केव्हा आकाश भरून येईल आणि पाऊस कोसळेल ही टांगती तलवार शेतकऱ्याच्या डोक्यावर कायम आहे. साहजिकच याचा परिणाम आंबा बागायतीवर होत आहे. आंबा बागायतीमध्ये पावसामुळे चिखल आहे. पाऊस कोसळत असल्याने नोव्हेंबरमध्ये येणारी थंडी अद्यापही सुरू झालेली नाही. जो काही भागामध्ये आंबा बागायतीत आंब्यांना मोहोर येतोय असे वाटत होते त्या भागातील आंबा बागायतीत आलेला थोडाफार मोहोरही पावसाने कुजला आहे. सतत जो पाऊस पडत आहे त्यामुळे आंबा, काजू, या फळबागायतींना पोषक वातावरण होणं आवश्यक असते असे वातावरणही तयार झालेले नाही. त्यामुळे त्याचा फटका आंबा बागायतदारांना बसणारा आंबा बागायतदार पाऊस कधी जातोय आणि नोव्हेंबर डिसेंबरची कडाक्याची थंडी कधीपासून पडतेय त्या वातावरणाच्या प्रतीक्षेत आहेत. दरवर्षी नोव्हेंबर महिन्यात थंडीला सुरुवात होते. अनेक आंबा बागायतीत कणीदार मोहोर आलेला असतो. कोकणातील आंबा काजू बागायतदार शेतकरी आपल्या बागेतील झाडांचा मोहोर पाहून सुखावलेला असायचा. अगदी मार्च, एप्रिल, मे महिन्यात आंबा, काजू बागायतीतून चांगल उत्पन्न मिळेल अशा आशेवर तो असायचा. वर्षभराच्या खर्चाचे आडाखे तो मनात मांडायचा; परंतु यावर्षी मात्र कोकणातील थंडी आणि मोहोरावर अंदाज बांधणाऱ्या या शेतकऱ्याला काय होईल काहीच सांगता येणारे नाहीय. तो चिंतेत आहे. निसर्गाच्या लहरीपणाने नैसर्गिक बदलाने कोकणातील शेतकऱ्यांचे आर्थिकतेचे चक्रही कोलमडले आहे. कलिंगडाची बागायत शेती करणारा शेतकरीही काय करायचे या चिंतेत आहे. सगळाच हंगाम लांबणार आहे. सुपारी बागायतदार देखील निसर्गचक्रात बेजार झाला आहे. कोकणात जसा आंबा, काजू मोठ्या प्रमाणात होतो तसेच सुपारी, नारळ बागायती क्षेत्रही मोठे आहे. रतांबा बागायती करणारे शेतकरी आहेत. गतवर्षी रतांब्याला चांगला दर आला होता. रतांबा बागायतदार आपल्याकडे कमी आहेत. पूर्वपार वडिलोपार्जित रत आपल्या देशभरात जरी वेगवेगळया जातीचा आंबा तयार होत असला तरीही कोकणच्या हापूसला अगदी जागतिक स्तरावरही तोड नाही. कोकणातील हापूस आंबा स्वादिष्टपणाला सर्वत्र प्रसिद्ध आहे. कोकण म्हटले की देवगड, रत्नागिरी हापूस हे आपसूकच नाव जोडले जाते. कोकणातील हा आंबा वेळेत पावसाने विश्रांती घेतली, भरपूर थंडी पडली, मोहोर वेळेवर आला तर साधारण फेब्रुवारीपासून बाजारात येतो आणि जूनच्या पहिल्या, दुसऱ्या आठवड्यापर्यंत हा आंब्याचा हंगाम सुरू राहतो. कधी-कधी सुरुवातीला आंब्याचा असणारा दर नंतर मिळत नाही. काहीवेळा आंबा अचानकपणे बाजारात मोठ्या प्रमाणावर येऊ लागला की, आंब्याचा दर कमी होतो. आंबा बागायतदार शेतकऱ्याच्या हे सर्व अंगवळणी पडलेले आहे. काय घडू शकते याचा अंदाज बागायतदार शेतकऱ्याला येत असतो. यावर्षी अजुनही अधून-मधून कोकणात पाऊस पडत असल्याने आंबा हंगाम महिना-दीड महिना तरी लांबण्याची शक्यता आजच्या घडीला तरी निर्माण झाली आहे. कोकणच्या किनारपट्टीला गेले काही दिवसांमध्ये मुसळधार पाऊस, वादळी पाऊस असे समिश्र वातावरण तयार झाले आहे. साहजिकच याचा एक विचित्र परिणाम या आंबा बागायतींवर होत आहे. ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यात सर्वसाधारणपणे मोहोर येतो.

# आपली शेती म्हणजे सोन्याची खान; शेती जमिनी विकू नका-सामाजिक कार्यकर्ते लवेश म्हात्रे यांचे आवाहन

## सोशल मीडियाच्या माध्यमातून जनजागृती

दैनिक वादळ वार्ता
**उरण । प्रतिनिधी**

आज रायगड जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी आपल्या पिकत्या जमिनी कवडीमोल भावाने शासनाच्या विविध प्रकल्प साठी दिल्या आहेत. त्यामुळे येथील शेतकरी देशोधडीला लागला आहे. मूलभूत सेवा सुविधा पासून वंचित राहिला आहे ही बाब लक्षात घेऊन वशेणी येथील सामाजिक कार्यकर्ते लवेश म्हात्रे यांनी शेतकऱ्यांनो, भूमीपुत्रांनो आपल्या पिकत्या जमिनी विकू नका. देशोधडीला लागू नका. स्वतः च स्वतःचा विकास करा असे आवाहन सोशल मीडियाच्या माध्यमातून केला आहे. व्हाट्सअप वर त्यांचा हा सामाजिक संदेश मोठया प्रमाणात व्हायरल झाला आहे. भविष्यात रायगड जिल्ह्यात जमीन शिल्लक राहणार नाही किंवा शेती शिल्लक राहणार नाही त्यामुळे शेतकऱ्यांना, भूमीपुत्रांना एकत्र येऊन यावर पुढील विचार करणे गरजेचे आहे असे त्यांनी आपल्या सामाजिक संदेशात म्हंटले आहे.



**व्हाट्सअप वर व्हायरल झालेला मेसेज, आवाहन :-** आज शेतकऱ्याच मानसिक संतुलन बिघडलय कारण आज ७ व्या महिन्यात सुद्धा पाऊस जाण्याच चिन्ह दिसत नाही.निसर्गाणीपन शेतकऱ्याला वेठीस पकडले आहे. परिणामी ७० टक्के लोकांनी पुढल्या वर्षी शेती न करण्याचा मनात निर्णय घेतला आहे. कारण ह्या वर्षी एकरी भातापेक्षा २० हजार रुपये जास्त खर्च झाला आहे म्हणून खचून जाऊ नका माझ्या शेतकरीराजा.आपली भुमाता परप्रांतीय(ढेरगुजरे) आपल्या उरण, पेण, पनवेल-कोकणांत अमराठी माणसं जमिनी घेऊन त्यावर गावोगावी बॅनर लावून व खोट्या रील (व्हीडिओ) ची जाहिरात करून पैसे कमवतात आणि आपल्या लोकांना फसवून वेडे बनवतात.एकरच्या एकर जमिनी ते डेव्हलप करत आहेत.त्यांना जे महत्व समजलंय ते उरण,पेण,पनवेल-कोकणकरांना नाही समजलंय.यामध्ये उरण, पेण,पनवेल -कोकणातील माणसेही आली आणि आपल्या जमिनी कोकणांत असताना मुंबई- ठाण्यात नोकरीत जीव अडकवणारे कोकणवासी सुद्धा आले.जिथपर्यंत आपल्याला उरण, पेण, पनवेल- कोकणचं महत्व समजणार नाही तोपर्यंत आपण फक्त जमिनी विकणार.एका जमिनीवर पाच सहा नावे लावून भावा भावात भांडत बसणार आणि गावी जमिनी ओसाड टाकून, कूजवून मुंबई, ठाणे, नविमुंबईत नोकरी करत बसणार.यातून कृपया बाहेर या. हें म्हणजे एखाद्याने बॅंकेत सोने ठेवून भीक मागण्यासारखे झाले.उरण, पेण, पनवेल-कोकण बदलत आहे. पायाभूत सुविधा कोकणांत आल्या आहेत. अनेक नवनवीन प्रोजेक्ट डेव्हलप होत आहेत. कोकणची कनेक्टीव्हिटी वाढत आहे. सिलिंक, विमानतळ चालू झाल आत्ता अलिबाग कॉरिडॉर चालू होतोय ह्यामुळे उद्या अजुन नव नवीन प्रकल्प होणार.शाळा आहेत कॉलेजेस आहेत.उद्योग आणि शेतीची अनेक क्षितिजे आहेत.आपल्याला नोकऱ्या निर्माण करायच्या आहेत. मुंबईचे प्रदूषण सोडले तर इतर सर्व काही उरण, पेण, पनवेल- कोकणांत आहे.अजुन येत आहे. आणि जे मुंबईत नाही तो आनंद निसर्ग पर्यावरण सुद्धा कोकणात आहे.तरीही ठाणे, मुंबईची साथ काही सुटत नाही. मुंबईत, ठाण्यात राहण्याची हौस काही भागत नाही.उरण, पेण, पनवेल -कोकणातील जागा म्हणजे सोने, सोन्याची अंडी देणारी कोंबडी आहे. आपण लोखंडाच्या भावाने ती परप्रांतीयांना गुंठा २ ते ३ लाखने देत आहात आणि त्यातून ते परप्रांतीय (ढेरगुजरे) हिरे, मोती काढतील.मग ऐका कोकण तुमचे आणि भांडी घसा आमचे म्हणून जमिनी विकू नका आणि त्या ओसाड टाकू नका व कुजवुही नका. जमिनीवर काय काय करता येईल त्याचा अभ्यास करा.सल्ला घ्या आपल्या आगरी तज्ज्ञ शेतकऱ्यांचा. उरण, पेण, पनवेल चा कृषीविभाग काहीच मार्गदर्शन करत नाही.कृषिविभाग मृत्यू पावलाय. म्हणून आपल्या आपणच माणसांना विश्वासात घ्या. जवळच्या दहा शेतकऱ्यांना एकत्र जमवा व ग्रुप करा. आणि सामयिक शेतीत(लघुदयोग)करायला सुरुवात करुया.कुणी तुमची जमीन बळकावत नाही. सहकार क्षेत्र उरण, पेण, पनवेल -कोकणांत रुजवूया.कुठलाही राजकीय नेता तुमचे भले करणार नाही. तुमच्या जीवनाचे तुम्हीच शिल्पकार बना. आपणहून पुढे या आपल्या घामातून हिरे, मोती पिकवून वडिलोपार्जित काल्या आईला सोन्यानी मढवा.आधी उरण, पेण, पनवेल -कोकण वाचवा. गावी या आपल्या जमिनी आपल्या ताब्यात घ्या. सात बारा नीट करा. आर्थिक कुवतीचा अंदाज घ्या. प्रोजेक्ट कुठला राबवायचा ते ठरवा. आवश्यक ते नुसार प्रशिक्षण घ्या मच्छी,कुकुट, गाय म्हैस, शेळी, बटेर, पालन करा.एखादा गट करून सर्व मिळून वेअरहाऊस(गोडाऊन), सागरी, भुजल मच्छीमार सोसायटी करा. खादी ग्रामोद्योग, कृषी विद्यापीठ, पुण्याचे मिटकॉन ग्रुप तुम्हांला लागेल ते प्रशिक्षण देऊ शकतात. फुकट मिळण्याची अपेक्षा करु नका. तुम्ही व्यवसाय करणार आहात आणि तो दीर्घकालीन आहे तर त्यासाठी गुंतवणूक करावी लागेल. त्यांच्या कडून एक चांगला प्रोजेक्ट करून घ्या. बॅंकेत जा. मेनेजरला भेटा. एकदा भेटून ऐकणार नाही. पाच सहा वेळा जा. पहा सगळे तुम्हांला मदत करायला तयार होतील.पुणे विद्यापीठाला भेटी द्या. तुमच्या जमिनीत कित्ती प्रकारच्या गोष्टी करता येतात हें बघून तुम्हांलाच हसू येईल असे वाटेल कि, इतके दिवस काय झक मारली होती. पर्यटनाला तर अंतच नाही. गोवा मान झुकवेल एकदा पुर्ण पोटेंशीअलने उरण, पेण, पनवेल-कोकण पर्यटन सुरु झाले की !! कितीतरी तांदळाच्या प्रजाती आहेत.भाज्या आहेत रानभाज्या टाकला, डावला, कोवला, कुडूस, कंटोला, हळद्या, देटी, टेरा, शेवला, दुगीपाला,अंबाडी, शेवगी, शेगटाच्या शेंगा,पाल्याची पावडर(ीळपसर) आहे.कोकणची फळे आहेत.आंबा नारळ आहेत.कोकम आहे.सुपारी आहे.मसाल्याची पिके आहेत.औषधी वनस्पतींचे कितीतरी प्रकार कोकणला पोषक आहेत. सुगंधी वनस्पतींचे प्रकार आहेत.बांबू आहे.साग आहे शिसव आहे.अगदी चंदन सुद्धा होऊ शकते कोकणांत.!!! अजुन काय पाहिजे ? कोकणची माती शुद्ध आहे. रसायनांचा भडिमार नाही.सेंद्रीय जोडीला मधुमक्षिका पालन करा.मोकळ्या जमिनीत खेकडा, मत्स्यशेती करा.पुणे गोवा मुंबई तीन मार्केटस हात जोडून उभे आहेत. इकडे एक्स्पोर्ट साठी उभा समुद्र आहे.किती किती करता येण्यासारखे आहे.फक्त तुम्ही ठरवा.आणि पहिले पाऊल पुढे टाका.उरण, पेण, पनवेल -कोकणच्या ग्रामदेवता आणि कुलदेवता पुर्ण शक्तीनिशी तुमच्या मागे उभ्या राहतील.मी स्वतः माझ्या टेरेस गार्डनवर माझ्या घराला लागणारी भाजी केमिकल खतचे वापर न करता बनवितो. टेरेसवर जिताड्यांच्या पिल्लांची पैदास करतो. तसेच खुंटी, गुट्टी, इयर्स, भेट कलम ह्या सर्व प्रकारे आंब्यांचे१५० झाडे स्वतः बनवून लावली आहेत.सांगण्याचं तात्पर्य एवढेच की सोन्यासारखी जमीन सोन्याच्या भावाने विका.२ किंवा ३ लाखाला गुंठा विकू नका.पनवेल मधील मोठा खांदा येथील काही शेतकरी न्यायालयात गेल्यामुळे न्याया लयाने त्यांना १ गुंठयाला ५८ लाख रू भाव देण्याचा आदेश सरकारला दिला आहे म्हणून त्याही पेक्षा त्या शेतकऱ्यांना जास्त भाव मिळायला हवा हिच अपेक्षा आहे असे मत सोशल मीडिया वर लवेश दामोदर म्हात्रे वशेणी, तालुका उरण, जिल्हा रायगड यांनी व्यक्त केले आहे.विविध विषय संदर्भात नेहमी लवेश म्हात्रे हे सोशल मीडियाच्या माध्यमातून जनजागृती करीत असतात.

# युईएस उरण शाळेला आदर्श शाळा पुरस्कार

दैनिक वादळ वार्ता
**उरण । प्रतिनिधी**



समाज सेवा हीच खरी ईश्वर सेवा हे ब्रीद वाक्य घेऊन आज वर चाईल्ड केअर सामाजिक संस्था रायगड ही संस्था विकास कडू संस्थापक -अध्यक्ष ह्याच्या नेतृत्वा खाली ९ वर्ष समाज सेवेचे उपक्रम राबवत आहे.आज आदर्श शाळा तालुका हा उपक्रम हाती घेऊन रायगड जिल्हातील प्रत्येक तालुक्यात आदर्श शाळा निवडत आहे त्या प्रमाणे उरण मधून उरण एज्युकेशन सोसायटी (णएड) ह्या शाळेला उरण तालुका आदर्श शाळा पुरस्कार देण्यात आला.सदर पुरस्कार आवाज महामुंबईचा न्यूज चैनलचे संपादक मिलिंद खारपाटील (सल्लागार )यांच्या शुभ हस्ते यु ई एस चे मानद सचिव ऍड. राजेंद्र भानुशाली व यूईएस प्राचार्य सिमरण दहिया यांनी स्वीकारले. तेव्हा भावना व्यक्त करताना राजेंद्र भानुशाली म्हणाले की आत्ता उरण तालुक्यातून आमच्या शाळेला आदर्श शाळा उरण म्हणून पुरस्कार मिळाला त्या बद्दल मी चाईल्ड केअर सामाजिक संस्था रायगड चे आभारी आहोत आणी या पुढे यूईएस ची जबाबदारी वाढेल व शाळेतील मुलांसाठी आणखी काही जास्तीत जास्त विकास कसा होईल ह्या गोष्टीवर भर देण्यात येईल तसेच या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार विठ्ठल ममताबादे (मीडिया सल्लगार ), ऍड. विजेंद्र पाटील (कायदेशीर सल्लागार ),अभिनेते चेतन दादा पाटील (संस्कृतीक विभाग रायगड प्रमुख )यांची उपस्थिती होती. तर युईएस शाळेतर्फे समन्वयक मितेश पुरारकार, पर्यवेश्रिका सोनाली म्हात्रे, पर्यवेश्रिका श्रीमती योगिता चौधरी, पर्यवेश्रीका कु नैना सिंग, पर्यवेक्षिका रेश्मा वैदय, पत्रकार दिनेश पवार, पालकप्रतिनिधी अनुश्री पाटील, सरिता गुप्ता उपस्थितीत होते. तर संस्थे तर्फे संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष विकास कडू, कार्याध्यक्ष मनोज ठाकूर, कोषाध्यक्ष रोशन घरत, सदस्य रोशन धुमाळ, कु अभिषेक माळी, कु विवेक कडू हे उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक विकास कडू यांनी केले ते बोलताना म्हणाले युईएस ही एक शाळा नसून एक कुटूंब आहे, कारण शाळेत मुलांच्या शिक्षणाची खूप चांगल्या प्रमाणात काळजी घेतली जाते विशेषता सुरक्षा च्या बाबतीत २१३ सीसीटीव्ही कॅमेरे, मुलांना सुसज्य सायन्स लॅब, नीट नेटके ग्रंथलंय या सारख्या अनेक सोयी आहेत. आज २५ वर्ष या शाळेला कुठलाही गालबोट लागलेला नाही म्हणून उरण तालुक्यातील प्रत्येक पालकाला आपली मुले युईएस या शाळेत शिकवायची असे वाटते म्हणूनच आमच्या संस्थे ने युईएस या शाळेला आदर्श शाळा उरण हा पुरस्कार देण्याचे ठरवले तर आभार प्रदर्शन शाळेच्या प्राचार्य सिमरण दहिया यांनी मानताना म्हणाल्या की मी युईएस शाळाचा एक भाग आहे हे माझे भाग्य समजतो आज चाईल्ड केअर सामाजिक संस्था रायगड कडून युईएस शाळेला आदर्श शाळा उरण हा पुरस्कार दिल्या बद्दल युईएस शाळेतर्फे चाईल्ड केअर सामाजिक संस्थाचे आभार व्यक्त करतो या कार्यक्रमा प्रसंगी महामुंबईचे संपादक मिलिंद खारपाटील यांनी युईएस शाळेला २० पुस्तके ग्रंथलयात भेट म्हणून दिली.

# माझा कार्यकर्ता चारचाकीत ऐटीत फिरला पाहिजे-महेंद्रशेठ घरत

दैनिक वादळ वार्ता
**उरण । प्रतिनिधी**



मी आज जगभर फिरतो; परंतु आजपर्यंत ४५० कार्यकर्त्यांनाही विमान प्रवास घडवला आहे. एकेकाळी रामशेठ ठाकूर, जयंत पाटील यांच्या माध्यमातून परदेश प्रवासाला सुरुवात केली होती, पण त्यांची कार्यकर्त्यांना परदेशात नेण्याची परंपरा आणि वारसा आजही मीच जपतोय, हे अभिमानाने सांगेन. मी कार्यकर्त्याला कुटुंबाचा घटक मानतो, म्हणून त्याचे सुख-दुःखही आपले मानतो. त्यामुळेच आयुष्यात प्रामाणिकपणे साथ दिलेला प्रत्येक जण खूप महत्त्वाचा आहे. त्यामुळेच अनेक कार्यकर्त्यांना, सहकाऱ्यांना घरबांधणीसाठी मदत, फ्लॅट, बंगले दिले. एवढेच नाही तर माझा कार्यकर्ता ऐटीत चारचाकीत फिरला पाहिजे, म्हणून अनेकांना फोरव्हीलर (चारचाकी) दिल्यात. त्याचाच भाग म्हणून उरण तालुक्यातील चिरनेर येथील राजेंद्र जगन्नाथ भगत यांना शनिवारी संकष्टी चतुर्थीच्या शुभमुहूर्तावर टाटाची नेक्सॉन भेट म्हणून दिली. माझा कार्यकर्ता, सहकारी आनंदी तर मी अत्यानंदी, ही माझी कायम भूमिका राहील, असे आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी चिरनेर येथे राजेंद्र भगत यांना चारचाकी दिल्यानंतर आपल्या भावना व्यक्त केल्या.ते पुढे म्हणाले, आयुष्य जगत असताना मी सतत सकारात्मक विचार केला. माझ्यावर अनेक बरेवाईट प्रसंग आले, २०१४ च्या विधानसभा निवडणुकीनंतर तर आर्थिक डोलारा पार कोसळला, पण अशावेळी खरी साथ लाभली ती सौभाग्यवती शुभांगीताईंची. 'माझे सर्व सौभाग्य लेणे (दागिने) विका, पण ताण घेऊ नका', असे म्हणणाऱ्या त्या एकमेव होत्या. त्यावेळी मी परिस्थितीनुरूप सौभाग्यवतींचे सर्व दागिने विकले; परंतु मनाशी दृढनिश्चय केला आणि पुन्हा जोमाने कामाला लागलो. मेहनतीशी तडजोड केली नाही, पडेल ते काम केले, आयुष्यातील प्रत्येक क्षण वेगळा अनुभव देत गेला. त्यातूनच पुढे आई-वडिलांच्या आशीर्वादाने आणि परमेश्वराच्या कृपेने मला सुगीचे दिवस आले. त्यामुळेच मी 'सुखकर्ता' बंगल्यावर आलेला प्रत्येक गरजवंत रिकाम्या हाताने परत जाणार नाही, याची काळजी घेतो. या कार्यक्रम प्रसंगी उरण विधानसभा युवक इंटक आणि चिरनेर काँग्रेस अध्यक्ष आणि चारचाकीचे लाभार्थी राजेंद्र भगत म्हणाले, मी आमचे नेते महेंद्रशेठ घरत साहेबांना गुरुस्थानी मानतो. त्यांनी मला माझ्या आजवरच्या बऱ्यावाईट प्रसंगात दिलेली साथ मी कधीही विसरू शकत नाही. त्यांच्यामुळेच माझे चारचाकीचे स्वप्नही पूर्ण होऊ शकले. आज माझ्या कुटुंबाचे स्वप्न पूर्ण झाल्याने आम्ही आनंदी आहोत. महेंद्रशेठ घरत यांच्यासारखे नेते सर्वांना लाभत नाहीत, पण आम्ही परमभाग्यवान आहोत, की महेंद्रशेठ घरत यांच्यासारखे नेते आमच्या मागे कायम खंबीरपणे उभे आहेत. आमची स्वप्न पूर्ण करण्यासाठी ते स्वतः १५-१६ तास मेहनत करतात. संकष्टी चतुर्थी निमित्ताने चिरनेर महागणपतीच्या मंदिराच्या प्रांगणामध्ये रायगड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते चारचाकीचे पूजन करण्यात आले. यावेळी या कार्यक्रमासाठी उरण तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष विनोद म्हात्रे, रायगड काँग्रेस उपाध्यक्ष मुरलीधर ठाकूर, महाराष्ट्र प्रदेश युवक इंटक उपाध्यक्ष लंकेश ठाकूर, उरण तालुका पर्यावरण अध्यक्ष अंगद ठाकूर,काँग्रेस नेते अलंकार परदेशी, भेंडखळ उपसरपंच अजित ठाकूर, उरण तालुका पर्यावरण उपाध्यक्ष नितीन नारंगीकर, सचिन घबाडी, किरण कुंभार, राजेश ठाकूर, तसेच परिवाराचे सदस्य, मित्र परिवार आणि ग्रामस्थ उपस्थित होते.यावेळी एमजी ग्रुपचे अनेक सहकारी उपस्थित होते.

# मोड (तालुका.तळोदा) येथील लोकहितकारी बंधारा ओव्हरफ्लो!

## ४० लाखांचा प्रकल्प यशस्वी; आमदार पाडवींच्या मध्यस्थीनंतर तातडीने पाट्या लागल्या, पण सुरक्षिततेसाठी 'संरक्षण भिंत' कधी?

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

नमस्कार! तळोदा तालुक्यातील मोड येथील निजरा नदीवर जलसंधारण विभागाने अंदाजित ४० लाख रुपये खर्चून उभारलेला साठवण बंधारा पहिल्याच वर्षी शंभर टक्के क्षमतेने भरून ओसंडून वाहत असल्याचा अत्यंत दिलासादायक परिणाम समोर आला आहे. वर्षानुवर्षे जाणवणारा उन्हाळ्यातील पाणीटंचाईचा प्रश्न कायमस्वरूपी संपुष्टात येण्याची चिन्हे असल्याने परिसरातील शेतकरी व नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

आमदार राजेश पाडवी यांच्या पुढाकारातून मृदा व जलसंधारण विभागामार्फत पूर्व भागात उभारलेला हा पहिलाच बंधारा ठरला आहे. यंदाच्या दमदार पावसामुळे या बंधाऱ्यात पाण्याची मोठी साठवण झाली असून, यामुळे शेतशिवारे, गावांना थेट लाभ होणार आहे. परिसरातील कूपनलिका आणि विहिरींच्या पाणीपातळीत मोठ्या प्रमाणात वाढ होण्याची शक्यता असल्याने शेतकरी आता उन्हाळी पिके घेण्यास सज्ज होतील



आणि परिसराची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होईल.

हा प्रकल्प यशस्वी करण्यात ग्रामस्थांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे ठरले आहे. प्रशासकीय दिरंगाईमुळे सिंचन विभागाने बंधाऱ्यात पाणी अडवण्यासाठी आवश्यक पाट्या लावलेल्या नव्हत्या. बंधारा रिकामा राहण्याची भीती असताना, गावातील युवक आणि नागरिकांनी एकत्र येत आमदार राजेश पाडवी यांची तातडीने भेट घेतली आणि पाट्या बसवण्याची विनंती केली.

आमदारांच्या मध्यस्थीनंतर ठेकेदाराने त्वरित फायबर आणि लोखंडाच्या संयोगातून तयार झालेल्या पाट्या गावात आणल्या. मोडच्या सरपंचांच्या उपस्थितीत दुसऱ्याच दिवशी जेसीबी यंत्राच्या मदतीने या पाट्या बसवण्यात आल्या. प्रशासकीय दिरंगाईवर मात करत गावकऱ्यांनी लोकप्रतिनिधींच्या भेटीतून प्रकल्पाला चालना दिली आणि सामुदायिक जबाबदारीचे उत्तम उदाहरण या निमित्ताने दिले.

एकीकडे लोकसहभागातून पाणी अडवण्याचे महत्त्वाचे काम झाले असले तरी, बंधाऱ्याच्या सुरक्षिततेबाबत संबंधित विभागाकडून अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याची तीव्र नाराजी परिसरातील शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, ४० लाख रुपये खर्चून पाणी अडविण्यासाठी बंधारा बांधला, पण तो ओव्हरफ्लो होत असतानाही त्याच्या संरक्षण भिंतीची व्यवस्था करण्यात आलेली नाही. तातडीने सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून संरक्षक भिंत बांधणे आवश्यक आहे, अन्यथा भविष्यात मोठी हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रशासनाने तातडीने या लोकहितकारी प्रकल्पाच्या सुरक्षिततेकडे लक्ष देऊन संरक्षक भिंत बांधण्यासाठी पावले उचलावीत, अशी मागणी मोड परिसरातील जनतेने केली आहे.

# आरमोरी येथे तालुका व्हाइस ऑफ मिडिया चे वतीने लोगो चे अनावरण



दैनिक वादळ वार्ता
**आरमोरी । प्रतिनिधी**

व्हाइस ऑफ मिडिया महाराष्ट्र राज्य अधिवेशन चे अनुषंगाने आरमोरी तालुका शाखेच्या वतीने लोगो चे अनावरण करण्यात आले त्यावेळी आरमोरी विधान सभा माजी आमदार आनंदराव गेडाम, अमोल मारकवार माकपा, डॉ महेश कोपुलवार भाकपा, संदीप ठाकूर जिल्हाध्यक्ष शिवसेना (शिंदे गट), विनोद बेहरे सुवर्णकार, रणजीत बनकर मनसे, मनोज पांचलवार उप सरपंच, नंदुभाऊ पेठेवार जिल्हा उपाध्यक्ष भाजपा, प्रकाश खोब्रागडे भाकपा यांचे हस्ते व्हॉईस ऑफ मिडीयाच्या पंढरपूर अधिवेशनाच्या लोगोचे अनावरण आरमोरी येथील पत्रकार संघाचे कार्यालयात करण्यात आले. यावेळी व्हॉईस ऑफ मिडीया तालुका अध्यक्ष ऋषी सहारे , कार्याध्यक्ष दौलत धोटे, उपाध्यक्ष सुरेंद्र बावनकर, सचिव राजेंद्र मोटघरे, मिडिया प्रमुख सुरेश कांबळे, सल्लागार भिमराव ढवळे, रोहिदास बोदेले, प्रा. भाग्यवान मेश्राम उपस्थित होते.

# परळीत खा.सोनवणेंचा मास्टरस्ट्रोक; मुंडेंना धक्का देत माजी नगराध्यक्षांचा राष्ट्रवादीत प्रवेश

## मुंबईत शरद पवार यांच्या उपस्थितीत तुतारी घेतली हाती

दैनिक वादळ वार्ता
**परळी । प्रतिनिधी**

परळीत मुंडेंच्या एकाधिकारशाहीला सूरूंग लावण्यासाठी खा.बजरंग सोनवणे यांनी नवनवीन डाव टाकायला सुरूवात केली असून आ.मुंडे यांचे सहकारी तथा परळीचे माजी नगराध्यक्ष दिपक देशमूख आणि पत्नी संध्याताई देशमूख यांनी दि.१० नोव्हेंबर रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत (शरद पवार गट) प्रवेश केला. सदरील प्रवेश पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडला.



> दिपक देशमूख हे परळीचा विकास व्हावा, यासाठी आज राष्ट्रवादी शरद पवार गटात आलेले आहेत. परळीत कुणाची किती ताकद आहे, ते आता कळणार असून परळीचा गड आम्ही राखू. परळीत सर्व कार्यकर्त्यांना एकत्रित बसवून परळी नगर पालिकेचा उमेदवार ठरवला जाणार आहे.
> –खा.बजरंग सोनवणे, बीड.

परळीत आ.धनंजय मुंडे यांच्या राजकारणाला शह देण्यासाठी खा.बजरंग सोनवणे यांनी सुरूवात केलेली आहे.नगरपालिका निवडणूकीत राष्ट्रवादी शरद पवार गट ताकदीने उतरणार असल्याने शहरातील मात्तबर मंडळी मुंडेंना सोडून पर्यायाची चाचपणी करत आहे. ज्यांना शहराचा विकास व्हावा, असे वाटत आहे, अशी मंडळी मुंडेंपासून दूर होवू लागली असून यात माजी नगराध्यक्ष दिपक देशमूख, त्यांच्या पत्नी संध्याताई देशमूख यांनी खा.बजरंग सोनवणे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत आज मुंबईत राष्ट्रवादीचे नेते शरद पवार, आ.जितेंद्र आव्हाड, पक्षाचे नवनिर्वाचित प्रदेश सरचिटणीस राजाभाऊ फड यांची यांची उपस्थिती होती. दिपक देशमूख हे परळीच्या राजकारणात अनेक वर्षांपासून सक्रिय आहेत. त्यांनी परळीचे नगराध्यक्षपदही भुषविलेले आहे. त्यांच्या कार्यकाळात परळी शहरात मोठ्या प्रमाणात दर्जेदार विकास कामेही झालेली आहेत. दरम्यान, प्रवेशानंतर माध्यमांशी बोलताना दिपक देशमूख म्हणाले, येथील आमदार सत्ताधाऱ्यांचे काम पाहिले तर कोणतेही विकास काम त्यांनी केलं नाही. जे काही कामे केली त्यात भ्रष्टाचार करण्यात आला. आम्ही वारंवार ही बाब वरिष्ठांच्या कानावर घातल्यावरही यावर कुठला मार्ग निघाला नाही. परळीतील अर्धवट विकास कामे यामुळे मी पक्ष सोडण्याचा निर्णय घेतला आहे. सहा महिन्यापासून मी या कामाला लागलो होतो. मी लोकसभेला पंकजा मुंडे यांचे काम केले त्यानंतर विधानसभेला धनंजय मुंडे यांचे काम केले, असेही ते म्हणाले.

# उच्च शिक्षित जगदीश ठाकुर यांची शिवसेना पनवेल उपतालुका प्रमुख पदी नियुक्ती

दैनिक वादळ वार्ता
**उरण । प्रतिनिधी**

वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने व शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे उप-मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, तसेच संसद महारत्न खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या आदेशानुसार, जिल्हा प्रमुख रामदास शेवाळे यांनी जगदीश ठाकुर यांची शिवसेना पनवेल उपतालुका प्रमुख पदी नियुक्ती केली आहे.उच्च शिक्षीत, अभ्यासू , हुशार, संयमी, कार्यकुशल, सर्वांच्या हाकेला धावुन जाणारे, सर्वांना सोबत घेवुन चालणारे व्यक्तिमत्व असून ते मुर्बी गाव कमीटी तथा संत रोहिदास चर्मकार संघटनेचे अध्यक्ष असून आपल्या कार्यकौशल्य, नेतृत्वगुण आणि



समाजसेवेच्या वृत्तीमुळे मिळालेली ही निवड खरंच अभिमानास्पद आहे.असे गौरवोदगार खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांनी काढले.वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा हिंदुत्वाचा विचार आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांची शिकवण याचा आपण सक्रीयपणे प्रचार आणि प्रसार कराल तसेच शिवसेना पक्ष वाढीसाठी आपण सर्वांना सोबत घेऊन कार्य कराल असा विश्वास आहे.शिवसेना पनवेल उपतालुका प्रमुख झालेली निवड ही अत्यंत आनंददायक आणि गौरवाची बाब आहे.आपण पक्षनिष्ठा, संघटनशक्ती आणि कार्यतत्परतेच्या जोरावर मिळविलेल्या या यशाबद्दल आम्हाला अभिमान वाटतो.आपल्या नेतृत्वाखाली पक्षाचे कार्य अधिक जोमाने आणि जनतेच्या सेवेसाठी समर्पित पद्धतीने पुढे जाईल, असा आम्हाला विश्वास आहे.असेही मत बारणे यांनी या वेळी व्यक्त केले. या नियुक्ती बद्दल जगदीश ठाकूर यांनी सर्व वरिष्ठ नेत्यांचे, सर्व पदाधिकारी कार्यकर्त्यांचे आभार मानले आहेत. जगदीश ठाकूर यांची उप तालुका प्रमुख पदी निवड झाल्याने त्यांच्यावर सर्वच स्तरातून अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक काँग्रेस नगराध्यक्ष, नगरसेवक पदासाठी इच्छुकांच्या मुलाखती संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**मुखेड । प्रतिनिधी**

मुखेड नगरपालिका निवडणुकीत काँग्रेस पक्षाकडून नगराध्यक्ष पद व नगरसेवकांसाठी इच्छुकांच्या मुलाखती पार पडल्या.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पडघम वाजल्यानंतर राजकीय पक्षांकडून इच्छुकांच्या मुलाखती सुरू झाल्या असून रविवार (दि.९) रोजी येथील काँग्रेस भवनात जिल्हाध्यक्ष माजी आ. हनमंतराव पाटील बेटमोगरेकर, प्रदेश महासचिव डॉ श्रावण रॅपनवाड, तालुकाध्यक्ष राजू पाटील, जिल्हा उपाध्यक्ष राजन देशपांडे, शौकत पठाण, शहराध्यक्ष हनमंत नारनाळीकर आदींनी नगराध्यक्षपदासह इच्छुक नगरसेवक पदाच्या उमेदवारांची मुलाखत घेतली. नगराध्यक्ष पदासाठी डॉ दिपाली श्रावण रॅपणवाड यांनी तर नगरसेवक पदासाठी २० जागांवर ५३ जणांनी मुलाखती दिल्या




आहेत.

यावेळी मुखेड नगरपालिका निवडणुकीसाठी डॉ. श्रावण रेपणवाडे यांच्या अध्यक्षतेत कोर कमिटीची स्थापना करण्यात आली. यात सदस्य पदी शहराध्यक्ष हनमंत नारनाळीकर, युवक अध्यक्ष जयप्रकाश कानगुले, रामेश्वर पाटील इंगोले, अल्पसंख्यांक अध्यक्ष इम्रान पठाण, शिवाजी गायकवाड, इरफान मोमीन यांची निवड जाहीर करण्यात आली.

# केज येथील कृषी प्रदर्शनास शेतकऱ्यांचा प्रतिसाद!

## दरवर्षी कृषी प्रदर्शन व्हावे; शेतकरी,व्यावसायिकांची अपेक्षा

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील कृषिधन २०२५,शिंजीर मिल्क ण्ड ग्रो प्रोडयुसर कंपनी केज यांच्या वतीने दि.७ ते ९ हे तीन दिवशीय कृषी प्रदर्शन विठाई मंगलकार्यालय येथे

संपन्न झाले. तिसऱ्या दिवशी समारोप कार्यक्रमात शेतकरी, विविध कंपनीचे स्टॉलधारक यांचा सन्मान करून संचालक विशाल चौरे यांनी कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी बोलताना उपस्थित शेतकरी आणि व्यवसायिकांनी पुढील वर्षी कृषी प्रदर्शन आयोजित करावे अशी मागणी व्यक्त केली.

तिनही दिवस कृषी प्रदर्शनात मोठ्या संख्येने व्यावसायिक शेतकरी, विद्यार्थी कृषी प्रदर्शन पाहण्यास आले होते. पहिल्या दिवशी उद्घाटन झाले. दुसऱ्या दिवशी शाश्वत शेती या विषयावर विनायक पोळ यांचे व्याख्यान संपन्न झाले. तिसऱ्या दिवशी समारोप कार्यक्रमात मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी आधुनिक तंत्रज्ञानाची गरज आहे कृषी प्रदर्शन या भागातील शेतकरी आणि व्यावसायिकांना वरदान ठरले असल्याचे मत व्यक्त केले. या प्रदर्शनात महाराष्ट्रातील






शेतीशी निगडीत आधुनिक तंत्रज्ञान , पाणी व्यवस्थापन , पिक व्यवस्थापन या क्षेत्रात काम करणाऱ्या कंपन्या सहभागी झाल्या होत्या. केज तालुक्यात पहिल्यांदाच कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आल्याने अनेक शेतकऱ्यांनी,शेतकरी गटांनी कृषी प्रदर्शनास भेटी दिल्या या प्रदर्शनात शेतकऱ्यांसाठी आधुनिक शेतीतील नवीन तंत्रज्ञान, सेंद्रिय शेतीचे महत्त्व, ठिबक सिंचन पद्धत, ड्रोन फवारणी ,ऊस, सोयाबीन, भात, डाळी इत्यादी पिकांची सुधारित वाण यांची माहिती देण्यात आली. तसेच विविध कृषी यंत्रसामग्री, खत, बियाणे आणि कीड नियंत्रणाचे उपाय यांचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. अनेक शेतकरी या प्रदर्शनाला भेट देऊन मार्गदर्शन घेत होते. तिसऱ्या दिवशी कृषी प्रदर्शनाची ग्रामीण भागात का गरज आहे या विषयावर व्याख्यान झाले. शेतकऱ्यांना संपन्न व्हायचे असेल तर आधुनिक तंत्रज्ञानाशिवाय पर्याय नाही असे मत व्यक्त करण्यात आले. महिलांसाठी विशेष स्वयं सहायता गटांचे स्टॉल लावण्यात आले होते, ज्यामध्ये घरगुती उद्योग, दुग्ध व्यवसाय, शेळीपालन, कुक्कुटपालन इत्यादी विषयांवर माहिती दिली गेली. विद्यार्थ्यांसाठी कृषी मार्गदर्शन सत्रही घेण्यात आले. प्रयोगशील शेतकरी यांनीही कृषी प्रदर्शनास भेटी दिल्या या प्रदर्शनामुळे शेतकऱ्यांमध्ये नव्या तंत्रज्ञानाविषयी उत्सुकता निर्माण झाली असल्याचे दिसून आले शिंजीर मिल्क ण्ड ग्रो प्रोडयुसर कंपनीने पुढाकार घेत या कृषी प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. यामुळे केज तालुक्यातील तसेच बीड जिल्हयातील शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान समजून घेण्यासाठी येत आहेत प्रदर्शनामध्ये प्रगत शेती मशिनरी , आधुनिक साधने ,सुधारीत बीयाणे, खते ,किटक नाशके ,दुग्धव्यवसाय या विषयी थेट प्रात्यक्षीके आहेत. हे प्रदर्शन शेतकरी, व्यापारी, विक्रेते, वैज्ञानिक, विदयार्थी यांच्यासाठी एक व्यासपीठ म्हणुन उपलब्ध आहे. बायोगॅस ड्रायर, ड्रोन प्रात्यक्षिक, ग्रामसंस्कृती देखावा ठरले प्रमुख आकर्षण, कृषी प्रदर्शनात ड्रोन फवारणीचे प्रात्यक्षिक व ग्राम संस्कृती तयार करण्यात आलेला जिवंत देखावा हे कृषी प्रदर्शनातील महत्त्वाचे आकर्षण ठरले या भोवती अनेक विद्यार्थी शेतकरी जिज्ञासुपने निरीक्षण करताना दिसून आले.

**विविध कंपनीचे प्रतिनिधी**

स्टॉल घेऊन कृषी प्रदर्शनात सहभागी झाले होते.
शेतकरी व्यवसायिकांनी साधनांची खरेदी
साधने बुकिंग केले,
कृषी प्रदर्शनामुळे
सवलतीच्या दरात शेतीची साधने उपलब्ध झाली. शेतकऱ्यांचा फायदा यामुळे शेतकऱ्यांनी समाधान शहरातील नोकर वर्गातील नागरिकांनी कृषी प्रदर्शनास कुटुंबासह भेटी दिल्या. विद्यार्थ्यांसाठी हे कृषी प्रदर्शन उत्सुक असे ठरले ग्रामीण भागातील शेतकऱ्यांनी कृषी प्रदर्शनात सहभाग नोंदवला. केज येथील कृषी प्रदर्शन यशस्वी झाले.

# सौजन्य, सेवा आणि पर्यावरणाचा संदेश!

## तळोद्यात 'परिवहन दिन' उत्साहात; रिक्षा, टॅक्सी, घंटागाडी चालकांचा प्रमाणपत्र देऊन गौरव

दैनिक वादळ वार्ता
नंदुरबार | दिपक गोसावी

तळोदा तालुका महाराष्ट्र प्रदेश प्रवासी महासंघ तळोदा आणि ग्राहक पंचायत महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने तळोदा येथे परिवहन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी रिक्षा, टॅक्सी आणि घंटागाडी चालकांना प्रमाणपत्र आणि गुलाब पुष्प देऊन त्यांच्या सेवेबद्दल सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमामागे लोकांमध्ये वाहतुकीचे नियम आणि वाहनांविषयी जागरूकता वाढवणे, तसेच पर्यावरणावर होणारे दुष्परिणाम कमी करणे हा मुख्य उद्देश होता. यावेळी बोलताना वक्ता पंडित भामरे आणि प्राध्यापक राजाराम राणे यांनी चालकांना मोलाचा संदेश दिला. त्यांनी आवाहन केले की, टॅक्सी, रिक्षा चालकांनी प्रवाशांशी आणि नागरिकांशी सौजन्याने वागून त्यांना चांगली आणि उत्कृष्ट सेवा द्यावी. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्राहक पंचायतीचे जिल्हा सचिव अशोक सूर्यवंशी यांनी केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते तळोदा शहरातील अनेक चालकांना त्यांच्या चांगल्या सेवेबद्दल सन्मानित करण्यात आले. सन्मानित झालेल्यांमध्ये खंडू कोळी, जाहिरोद्दीन शेख, अमानुद्दीन शेख, संजय तांबोळी, प्रकाश कलाल, लालसिंग वळवी, भूपेंद्र तीजबीज, सुनील माळी, मोहन वाघ, मजुरोद्दीन शेख, प्रकाश तिजवी, सुनील गोजरे, आनंद मंगळे, शंकर साळुंखे, संदीप गोजरे, संजीव गोजिरे आणि संजय कलाल यांचा समावेश



होता. या कार्यक्रमास ग्राहक पंचायतीचे जिल्हाध्यक्ष प्रा. डॉ. संजय कुमार शर्मा, जिल्हा सचिव अशोक सूर्यवंशी, जिल्हा उपाध्यक्ष कीर्ती कुमार शहा, प्रवासी महासंघाचे तालुकाध्यक्ष डव्होकेट अल्पेश जैन, सचिव प्राध्यापक राजाराम राणे, ग्राहक पंचायतीचे तालुका अध्यक्ष रमेश कुमार भाट, सचिव शरद सूर्यवंशी, चेतन धनका, मनीष सुगंधी, पंकज तांबोळी, भूषण येवले, महिला प्रतिनिधी रशीलाबेन देसाई, अमिबेन तुरखिया, टॅक्सी चालक युनियनचे अध्यक्ष जाहिरोदिन शेख, रिक्षाचालक युनियनचे अध्यक्ष पंकज मगरे आदी मान्यवर उपस्थित होते. आभार प्रदर्शन रमेश कुमार भाट यांनी केले आणि कार्यक्रमाची सांगता झाली. हा कार्यक्रम केवळ चालकांचा गौरव नव्हता, तर त्यांना जबाबदार नागरिक म्हणून उत्तम सेवा देण्यास प्रेरित करणारा आणि सुरक्षित व पर्यावरणपूरक वाहतुकीचा संदेश देणारा महत्त्वाचा उपक्रम ठरला.

# ग्रामपंचायत अधिकाऱ्यांचे श्रमदान: नागझिरीत वनराई बंधारा उभारून जलसंधारणाचा आदर्श

दैनिक वादळ वार्ता
नंदुरबार | दिपक गोसावी

शहादा तालुक्यातील ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी आज एक अनोखा आदर्श घालत 'श्रमदानातून जलसंधारण – विकासाच्या दिशेने' हा संदेश दिला. त्यांनी नागझिरी ग्रामपंचायतीत वनराई बंधारा उभारण्याचा उपक्रम यशस्वीपणे राबवला. ग्रामीण विकासात जलसंधारणाचे महत्त्व अधोरेखित करणारा हा उपक्रम शासकीय अधिकाऱ्यांच्या पुढाकारातून प्रत्यक्ष कृतीत उतरलेला पाहायला मिळाला.

हा उपक्रम मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला. शहादा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संजय सोनवणे व सहाय्यक गटविकास अधिकारी विकास राठोड यांच्या



नेतृत्वाखाली ग्रामपंचायत अधिकारी बांधवांनी सामूहिक श्रमदान करत जलसंधारणाचे उत्कृष्ट काम हाती घेतले.

श्रमदानात सहभागी अधिकारी: कुवरसिंग नाईक, नारायण पवार, संतोष पाडवी, किशोर वळवी, रमेश गावीत, मनोज पाडवी, गणेश चोरे, लालसिंग कोकणी, चंद्रसिंग ठाकरे, सुरेश कोकणी, वामन पाडवी, मुकुंद चोरे, अजय वसावे, भरत गोटम, मन्साराम सोनवणे तसेच गावातील रोजगार सेवक.

वनराई बंधाऱ्याचे प्रमुख लाभ म्हणजे जलसाठा वाढण्यास मदत भूजल पातळीत सुधारणा शाश्वत शेतीला प्रोत्साहन गावाच्या सर्वांगीण विकासाला गती ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या पुढाकारातून राबविण्यात आलेला हा उपक्रम शासनाच्या जलसंधारण अभियानाला बळ देणारा असून, ग्रामीण विकासाचा प्रेरणादायी नमुना ठरला आहे.

# ऐश्वर्या घुले तसेच दिपाली पाटील या खेळाडूंची राज्यस्तरीय मैदानी स्पर्धेसाठी निवड

दैनिक वादळ वार्ता
केज | प्रतिनिधी

जीवन विकास शिक्षण मंडळ केज संचलित, स्वामी विवेकानंद विद्यामंदिर माध्यमिक विभाग केज या शाळेतील घुले ऐश्वर्या बप्पाजी तसेच पाटील दिपाली भीमाशंकर या खेळाडूंची राज्यस्तरीय मैदानी स्पर्धेसाठी निवड झाली.त्यांच्या या नेत्रदिपक यशाबद्दल जीवन विकास शिक्षण मंडळ संस्थेचे अध्यक्ष अंकुशरावजी इंगळे, सचिव जी.बी.गदळे, शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा शैलाताई इंगळे,शाळेच्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे यांच्या उपस्थितीमध्ये यशस्वी खेळाडूंचा पालकासह सत्कार करण्यात आला.



दि.८ नोव्हेंबर २०२५ वार शनिवार रोजी के.के.एम. महाविद्यालय मानवत या ठिकाणी पार पडलेल्या विभागीय मैदानी क्रीडा स्पर्धेत स्वामी विवेकानंद विद्यामंदिर या शाळेतील घुले ऐश्वर्या बप्पाजी या खेळाडूने १७ वर्ष वयोगटातून गोळा फेक, भालाफेक तसेच थाळीफेक या तिन्हीही क्रीडा प्रकारांमध्ये छत्रपती संभाजीनगर विभागातून सर्वप्रथम येण्याचा बहुमान मिळविला.तर पाटील दिपाली भीमाशंकर या खेळाडूने १७ वर्ष वयोगटातून गोळा फेक या क्रीडा प्रकारामध्ये छत्रपती संभाजीनगर विभागातून सर्वद्वितीय येण्याचा बहुमान मिळवला.वरील यशस्वी खेळाडूंना शाळेतील क्रीडा शिक्षक श्रीकिशन नेहरकर सर यांचे मार्गदर्शन लाभले.

वरील प्रथम व द्वितीय आलेले खेळाडू दि.११ ते १४ नोव्हेंबर दरम्यान एस. व्ही.जे.सी.टी.क्रीडासंकुल डेरवन ता.चिपळूण जि. रत्नागिरी या ठिकाणी होणाऱ्या राज्यस्तरीय मैदानी स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर विभागाचे नेतृत्व करणार आहेत.

# जिवाचीवाडी येथे रेणुकामाता यात्रे निमित्त जंगी कुस्त्यांचा फड रंगला

## भिकाराम सारूक,शिवाजी चौरे आदी नामांकित पहेलवान यांनी रंगवली झुंज

दैनिक वादळ वार्ता
केज | प्रतिनिधी

केज तालुक्यातील जीवाचीवाडी येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही रेणुकामाता (माहुरची आई) यात्रेचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.दिनांक ७ नोव्हेंबर,शुक्रवार रोजी आई रेणुकामातेच्या पालखीची मिरवणूक मोठ्या भक्तिभावाने व ढोल-ताशांच्या गजरात काढण्यात आली.पालखी मिरवणुकीस विविध सामाजिक,सांस्कृतिक संघटनांचा सहभाग होता. गावात रंगीबेरंगी सजावट, प्रकाश योजना आणि फटाक्यांची आतिषबाजी यामुळे वातावरण अधिकच मंगलमय झाले. मिरवणुकीनंतर भक्तांसाठी मनोरंजनाचा कार्यक्रम म्हणून लोकनाट्य व तमाशा



मंडळाचे सादरीकरण करण्यात आले.या कार्यक्रमाला परिसरातील ग्रामस्थ व भाविकांची मोठी उपस्थिती लाभली.

दुसऱ्या दिवशी शनिवारी पारंपरिक जंगी कुस्त्यांचा रोमांचक सामना पार पडला.यामध्ये भिकाराम सारूक,शिवाजी चौरे यांच्यासह परिसरातील नामांकित पहेलवानांनी उत्कृष्ट झुंज देत उपस्थित प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. विजेत्या पहेलवानांचा सन्मानही आयोजक समितीच्या वतीने करण्यात आला.या यात्रेच्या माध्यमातून धार्मिक श्रद्धा,सांस्कृतिक वारसा आणि ग्रामीण क्रीडा परंपरेचा सुंदर संगम पाहायला मिळाला. यात्रेचे आयोजन ग्रामस्थांच्या पुढाकाराने यशस्वीरीत्या पार पडले.

# दिल्लीत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार सणसर गावची कन्या कु.रुद्राणीराजे निंबाळकर

## राज्य पातळीवरून राष्ट्रीय पातळीवर झेप

दैनिक वादळ वार्ता
इंदापूर | प्रतिनिधी

इंदापूर तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक व सणसर गावचे युवा नेते मा. संग्राम सिंह दत्तात्रय निंबाळकर यांची कन्या हिने नुकत्याच झालेल्या अहिल्यानगर येथे क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य अंतर्गत घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत बारामतीची प्रतिभावान बॅडमिंटनपटू कु. रुद्राणीराजे निंबाळकर हिने उत्कृष्ट कामगिरी करत मोठे यश संपादन उत्कृष्ट कामगिरी करत मोठे यश संपादन केले आहे.




तिच्या दणदणीत खेळाच्या प्रदर्शनाच्या जोरावर महाराष्ट्राच्या राष्ट्रीय बॅडमिंटन संघात तिची निवड करण्यात आली असून आता ती दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहे. कु. रुद्राणीराजे निंबाळकर बॅडमिंटन क्षेत्रात आपली शिस्त चिकाटी आणि स्वप्नांवर असलेली निष्ठा यांच्या जोरावर आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

तिच्या या प्रवासाने कुटुंबाचे प्रोत्साहन दररोजचा सराव सातत्यपूर्ण शारीरिक प्रशिक्षण आणि खेळाप्रती असलेली जिद्द या गोष्टी आहेत. तिच्या या यशाबद्दल तिचे प्रशिक्षक श्री विनायक वांजरे सर आणि तिची शाळा विद्या प्रतिष्ठानचे न्यू इंग्लिश मीडियम स्कूल बारामती प्रिन्सिपल जॉयसी जोसेफ मॅडम व संपूर्ण स्टाफ यांनी मनापासून आभार मानण्यात आले. असून संसार परिसरातील नागरिकांकडून तिचे कौतुक व अभिनंदन केले जात आहे.

# राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी अल्पसंख्यांक विभाग बीड जिल्हाध्यक्षपदी शेख निजाम यांची नियुक्ती

दैनिक वादळ वार्ता
बीड | प्रतिनिधी

राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री माननीय नामदार अजित दादा पवार साहेब, राष्ट्रीय कार्याध्यक्ष श्री प्रफुल्ल भाई पटेल साहेब, राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष मा. खा. सुनीलजी तटकरे साहेब राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टीचे अल्पसंख्याक विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष अँड. जलालुद्दीन सय्यद साहेब त्यांच्या मार्गदर्शनाखाली व राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे विचार व शिव, शाहू, फुले ,आंबेडकर, मौलाना आझाद यांचे धर्मनिरपेक्ष विचार तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे अल्पसंख्यांक विभागाचे प्रदेशाध्यक्ष अँड. नाझेर काझी साहेब यांनी माजी मंत्री आ.धनंजय मुंडे साहेब, राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित साहेब,माजी आमदार संजय दौंड साहेब,आ.विजयसिंह पंडित साहेब, प्रदेश प्रवक्ता भागवत तावरे साहेब, बीड जिल्हाध्यक्ष अँड. राजेश्वर आबा चव्हाण साहेब,विधानसभा प्रमुख डॉ.योगेश क्षीरसागर, युवक जिल्हाध्यक्ष बळीराम गवते,महादेव अण्णा धांडे, अजिंक्य आनेराव,प्रज्ञाताई खोसरे,शहराध्यक्ष अमर नाईकवाडे, मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ चे संचालक शेख तय्यबभाई, गटनेते फारूक पटेल,नगरसेवक विनोद मुळूक,प्रा.गोपाळ धांडे, बीड यांच्या शिफारसी वरून बीड जिल्ह्यातील राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे धडाडीचे कार्यकर्ते शेख निजाम यांची बीड जिल्हा राष्ट्रवादी कॉँग्रेस अल्पसंख्यांक विभागाच्या जिल्हाध्यक्षपदी



नियुक्ती केलेली आहे नियुक्ती झाल्यानंतर शेख निजाम यांनी मी राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे विचार तळागाळापर्यंत पोहोचवण्याचा नेटाने प्रयत्न करीन व महाराष्ट्राची संस्कृती असलेली शिव शाहू फुले आंबेडकर मौलाना आझाद यांचे धर्मनिरपेक्ष पुरोगामी विचारांची बांधील राहून राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य मा. ना.अजित दादा पवार साहेब यांचे हात बळकट करण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करीन अशी ग्वाही दिली व मला अल्पसंख्यांक विभागाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी निवड केल्याबद्दल प्रदेशाध्यक्ष अँड नाझेर काझी यांचे व माझ्या नावाची शिफारस करणाऱ्या सर्व मान्यवरांचे आभार व्यक्त करतो व राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्ष व पक्ष संघटन वाढवण्यासाठी तसेच स्थानिक स्वराज्य संस्थे च्या निवडणुकीत यश मिळेल या साठी प्रयत्नाची पराकाष्टा करीन अशी हमी दिली राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्ष कार्यालय येथे शेख निजाम यांचा वरील मान्यवरांकडून सत्कार करण्यात आला.

# बडेबाबा विद्यामंदिराच्या चौकशीसाठी आमरण उपोषण सुरू

दैनिक वादळ वार्ता
गौतम बचुटे | केज

केज तालुक्यातील लव्हुरी येथील श्री बडेबाबा विद्यामंदिरच्या चौकशीसाठी धर्मवीर छत्रपती संभाजीराजे शौर्य प्रतिष्ठाणच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थ हे आमरण उपोषणाला बसले आहेत. या बाबतची माहिती अशी की, केज तालुक्यातील श्री बडेबाबा विद्यामंदीर लहुरी शाळेत विषय शिक्षकांची ५ पदे मागील ८ वर्षा पासुन रिक्त आहेत. ती रिक्त पदे तात्काळ भरण्यात यावी. त्यामुळे ८ वर्ष झालेल्या विद्यार्थ्यांच्या नुकसानासाठी जबादार असणाऱ्या संस्थेवर कार्यवाही करावी. मागील ८ वर्षापासुन शिक्षक नसल्यामुळे विद्यार्थ्यांची गणुवत्ता ढासळलेली आहे. शिक्षकांची व विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात यावी. या बाबत ग्रामसभेने सुद्धा ठराव घेतला आहे.



सोबत जोडला आहे. श्री. बडेबाबा शिक्षण प्रसारक मंडळ यांनी जागेचे बनावट व खोटे कागदपत्रे बनवुन शाळेने व संस्थेने शासनाची फसवणूक केलेली आहे. त्यांची चौकशी करून संबधीत दोषींवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात यावा. शाळेच्या जागेचे शासना कडुन भाडे घेण्यात येत आहे. त्याच जागेचे मालक म्हणून मंगलबाई संपत खांडेकर यांनी शासनाचा पिक विमा योजनेचा लाभ घेवुन शासनाची दुहेरी फसवणुक केलेली आहे. त्या बाबतीत सखोल चौकशी करुन दोषींवर कार्यवाही करण्यात यावी. शाळेची इमारत ही खाजगी व्यक्तीच्या नावे आहे. या इमारतीस नियमा प्रमाणे शासनाकडुन नियमित भाडे मिळत आहे; परंतु इमारत ही अत्यंत जीर्ण झालेली असुन भिंतीस भेगा पडलेल्या आहेत. तिथे विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका होऊ शकतो. त्या बाबतीत संबधीत इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात यावे. इमारत धोकेदायक असल्याने शाळा दुसऱ्या जागेत स्थलांतरीत करण्यात यावी. सन २०१८ पासुन मागासवर्गीय शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांना देण्यात आलेली नाही. याच्यामध्ये दोषीवर कार्यवाही करून विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप करण्यात यावी. नारदस्वामी विद्यामंदीर, बीड येथे कार्यरत असलेले सेवक श्री. गणेश बजरंग इतापे यांना सेवा जेष्ठते नुसार लिपीक पदावर नियुक्ती देणे आवश्यक असताना श्रीमती. तनुजा दाबेकर यांची बेकायदेशीर केलेली नियुक्ती रद्द करण्यात यावी. या मागण्यासाठी धर्मवीर छत्रपती संभाजीराजे शौर्य प्रतिष्ठाणसंस्थापक अध्यक्षः बाळराजे (दादा) आवारे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संदीप चाळक आणि ग्रामस्थ हे दि. १० नोव्हेंबर रोजी बडेबाबा विद्यामंदिर लव्हुरी येथील शाळे समोर आमरण उपोषणाला बसले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077